आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२१ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- जग अनिश्चिततेच्या गर्तेत असताना भारत आशेचा किरण म्हणून उदयाला आला असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- पोलीस स्मृतीदिनानिमित्त देशाचं शहीद पोलिसांना अभिवादन
- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज मेक्सिकोचा दौरा संपवून अमेरिकेत दाखल
- महाराष्ट्र आणि झारखंडमधे विधानसभेसाठी जागावाटपाबाबत चर्चांना वेग
- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दीपिका कुमारीला महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदक.

**आणि**

- बंगालच्या उपसागरात तयार होणारं दाना हे चक्रीवादळ येत्या दोन दिवसात ओदिशात धडकण्याची शक्यता

**<><><><><>**

भारत सर्वच क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती करत असून जगाचं भविष्य घडवण्यासाठी तो पुढाकार घेत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. एका खासगी माध्यम समूहाने नवी दिल्लीत आयोजित केलेल्या जागतिक शिखर परिषदेला ते संबोधित करत होते. जग जेव्हा अनिश्चिततेच्या गर्तेत असताना भारत आशेचा किरण म्हणून उदयाला आला असं म्हणतानाच मोदी यांनी कोविड, जागतिक अर्थव्यवस्था, महागाई, हवामान बदल, बेरोजगारी आणि युद्ध यांसारख्या जागतिक परिस्थितीच्या भारतावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केला.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या तिसऱ्या कार्यकाळातल्या विकासकामांविषयीही प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. रालोआ सरकारने तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या सव्वाशे दिवसांत ९ लाख कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. या काळात ८ विमानतळांचं बांधकाम सुरू झालं तसंच १५ नवीन वंदे भारत रेल्वे गाड्याही सुरू झाल्याचं ते म्हणाले. देशाचा परकीय चलन साठाही या काळात ७०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

आज पोलीस स्मृतिदिन. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख इथे चिनी सैन्याचा हल्ला परतवताना दहा पोलीस कॉन्स्टेबल शहीद झाले होते. त्यांच्यासह देशभरातल्या विविध मोहिमांमध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पोलिसांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आजचा दिवस पाळला जातो. या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय पोलीस स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशभरात शहीद झालेल्या पोलिसांच्या स्मृतींना नायगाव पोलीस मुख्यालयातल्या स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विविध देशांचे मुंबईतले वाणिज्यदूत आणि प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्र पोलीस दलानेही समाज माध्यमावरच्या संदेशातून शहीद पोलिसांना अभिवादन केलं आहे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या

ब्रीदवाक्याचा मान राखत जीवाची पर्वा न करता देशसेवा करणाऱ्या सर्व हुतात्मा पोलिसांना सलाम, असं या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

पोलीस स्मृती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या पोलीसांच्या शौर्य आणि बलिदानाचा गौरव केला आहे. समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये पोलिसांच्या अजोड समर्पणाची त्यांनी प्रशंसा केली.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज मेक्सिकोचा दौरा संपवून अमेरिकेत पोहचल्या. अमेरिकेतले भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा आणि न्यूयॉर्कमधले भारताचे महावाणिज्यदूत बिनय श्रीकांत प्रधान यांनी त्यांचं काल संध्याकाळी नेवार्क आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्वागत केलं. अर्थमंत्री १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान मेक्सिकोच्या दौऱ्यावर होत्या. यावेळी  त्यांनी ग्वाडालजारा आणि मेक्सिको सिटी मधल्या विविध क्षेत्रातल्या नेत्यांशी संवाद साधला. निर्मला सीतारामन २६ ऑक्टोबरपर्यंत अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. आपल्या दौऱ्यादरम्यान त्या जी-२० चे अर्थमंत्री, सेंट्रल बँकेचे गव्हर्नर, पर्यावरण मंत्री आणि परराष्ट्र मंत्र्यांच्या संयुक्त बैठकांमध्ये सहभागी होणार आहेत.

<><><><><>

भारत आणि संयुक्त अरब अमिराती या दोन्ही देशात संरक्षण सहकार्य बळकट करण्याच्या उद्देशाने भारताचे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आजपासून चार दिवसांच्या यूएई दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते यूएईचे नौदल प्रमुख रिअर ॲडमिरल पायलट सईद बिन हमदान अल नाह्यान आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करतील. या भेटीचं उद्दिष्ट सर्वच क्षेत्रातल्या व्यापक धोरणात्मक

भागीदारीच्या अनुषंगाने संरक्षण सहकार्य वाढवणं आणि द्विपक्षीय सागरी संबंध दृढ करणं असं आहे.

<><><><><>

उडे देश का आम नागरिक या प्रादेशिक विमान संपर्क योजनेला काल आठ वर्षं पूर्ण झाली. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं २१ ऑक्टोबर २०१६ ला ही योजना सुरू केली होती. UDAN योजनेत देशातील विमान सेवा नसलेल्या प्रदेशांमध्ये विमान मार्ग सुधारण्यावर आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत, ६०० हून अधिक विमान मार्ग कार्यान्वित झाले आहेत. आणि एक कोटी ४४ लाखांहून अधिक प्रवाशांनी विमानांद्वारे प्रवास केला आहे. या योजनेखाली आतापर्यंत देशातील ३४ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना जोडलं आहे. दोन हेलीपोर्ट्स व्यतिरिक्त ईशान्य प्रदेशात दहा विमानतळ देखील कार्यान्वित करण्यात आले आहेत. उडान योजना केवळ द्वितीय आणि तृतीय स्तरातील शहरांना संपर्क व्यवस्था प्रदान करत नाही तर पर्यटन क्षेत्रासाठी देखील एक प्रमुख सुविधा म्हणून सिद्ध झाली आहे. विमान संपर्क आणि प्रादेशिक वाढीला चालना देऊन ही योजना अनेक विमानतळांसाठी बदलाचा हुकुमी एक्का बनली आहे.

<><><><><>

जगभरात आज जागतिक आयोडिन कमतरता दिवस साजरा केला जातो. चांगल्या आरोग्यासाठी आयोडिनच्या आवश्यकतेबाबत जागरुकता वाढवणं आणि आयोडिनच्या कमतरतेमुळे होणाऱ्या विकारांवर प्रकाश टाकण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आयोडिनच्या कमतरतेमुळे माणसाच्या सर्वांगीण वाढ आणि विकासावर अनेक प्रतिकूल परिणाम होतात. आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे

विकार दूर करण्यासाठी सरकारने नॅशनल आयोडीन डेफिशियन्सी डिसऑर्डर कंट्रोल उपक्रम सुरू केला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि झारखंडमधे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांच्या बैठका होत आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडीमधे घटक पक्षांच्या जागावाटपाबाबत चर्चा सुरु आहेत.

**<><><><><>**

काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक आज दिल्लीत होणार आहे. यात महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीतल्या उमेदवारांच्या नावाबाबत चर्चा होणार आहे. याआधी महाराष्ट्र काँग्रेसने विधानसभा निवडणुकीसाठी ६२ नावांची यादी काँग्रेस कार्यकारी समितीकडे सादर केली होती. तर झारखंडमध्ये जागावाटपाबाबत इंडिया आघाडीतले घटक पक्ष नाराजी व्यक्त करत आहेत. काँग्रेसच्या आजच्या बैठकीत या सर्व मुद्यांवर चर्चा होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, संयुक्त जनता दलाने झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी जमशेदपूर पश्चिम आणि तमार मतदारसंघासाठी दोन उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **ठाणे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पोलिसांच्या गुन्हे शाखेनं दहाव्या आरोपीला अटक केली आहे. हा आरोपी नवी मुंबईतील एक भंगार व्यापारी असून मुख्य आरोपींना शस्त्र पुरवल्याच्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली आहे. त्याला २६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

मेक्सिको इथे सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या दीपिका कुमारी हिला आज महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत चीनच्या ली जियामन हिने सुवर्णपदक जिंकलं. तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत उपविजेतेपद पटकावण्याची दीपिकाची ही पाचवी वेळ आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या गांदरबल जिल्ह्यात गगनगीर इथं दहशतवाद्यांनी एक काश्मिरी डॉक्टर आणि ६ बांधकाम कामगारांची हत्या केली. सोनमर्गच्या झेड-मोड बोगदा परिसरात बांधकामाच्या ठिकाणी ही घटना घडली. दोन दहशतवाद्यांनी एका खासगी कंपनीच्या खानावळीमध्ये घुसून गोळीबार केला. यावेळी मारले गेलेले डॉ.शहनवाज हे बडगाम जिल्ह्यातील नईदगाम इथले रहिवासी होते. गेल्या तीन दिवसांतील मजुरांवर झालेला हा दुसरा दहशतवादी हल्ला आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा एन आय ए या प्रकारणाची चौकशी करीत आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे. या घृणास्पद हाल्ल्याचे चोख उत्तर दिले जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनीही या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र तयार होत असून दाना हे चक्रीवादळ तयार होत आहे. चक्रीवादळ अधिक शक्तीशाली होत असून येत्या दोन दिवसात ते ओदिशाच्या किनाऱ्याला धडकेल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ओदिशा राज्यसरकारने बचावाची तयारी केली आहे. चोवीस तास चालणारे नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आले असून संवेदनशील भागातल्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. मदत शिबिरांसाठी जागा वीज आणि पाणीपुरवठा यांची व्यवस्था करण्यात आली आहे.